पुणे पोलीस

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

प्रेसनोट दि. ०७/०९/२०१९

प्रेसनोट / पोलीस नोटीस / ब्रॉडकास्ट प्रसिद्धीसाठी

पीसीबी, दि. ७/०९/२०१९

विषय :- हद्दपार / तडीपार इसमांबाबत जाहीर प्रकटन.

महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५, ५६ व ५७ नुसार समाजातील विघातक कृत्यांना बाधा / धोका होणा-या व्यक्तीस विनिर्दिष्ट केलेल्या भागातुन ठराविक कालावधीकरीता हद्दपार / तडीपार करण्यात येते.

पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातुन अशा हद्दपार केलेल्या इसमांची फोटोसह अधिक माहिती पुणे शहर पोलीस या संकेतस्थळावर (www.punepolice.gov.in) – Menu – Police Corner – Crime review - Externee या शिर्षकाखाली उपलब्ध आहे.

याद्वारे, सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, पुणे शहर पोलीस आयुक्त कार्यक्षेत्रातून हद्दपार केलेल्या व्यक्तीं, हद्दपार कालावधीत विनिर्दिष्ट केलेल्या भागात / ठिकाणी पुन्हा दिसून आल्यास, त्याबाबतची माहिती पुणे शहरातील नागरिकांनी पुणे शहर मुख्य नियंत्रण कक्षास (फोन नं. १०० / २६१२२८८० / २६२०८२५०) अगर नजीकच्या पोलीस स्टेशनला फोनद्वारे द्यावी. **सदरची माहिती देणा-याचे नाव गुप्त ठेवण्यात येईल तसेच त्यांनी केलेल्या या धाडसाबद्दल व उत्कृष्ठ कामगिरीबद्दल त्यांना रु. १०००/- चे बक्षीस देवून सन्मानीत करण्यात येईल.**

त्याचप्रमाणे, **पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी बातमी मिळवून** हद्दपार इसम हद्दपार कालावधीत विनिर्दिष्ट केलेल्या भागात / ठिकाणी पुन्हा निदर्शनास आल्यास, त्याचेविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १४२ नुसार कारवाई केल्यास, त्यांना देखील रक्कम रु. १०००/- पर्यंतचे बक्षीस देवून गौरविण्यात येईल.

तरी समाजात भयमुक्त वातावरण निर्माण करण्यासाठी व सार्वजनिक सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी, गुन्हेगारी रोखण्यासाठी अशा हद्दपार इसमांचा शोध घेण्यासाठी **समाजातील सर्व नागरिकांनी पुणे शहर पोलीस दलास सहकार्य करण्याचे याद्वारे आवाहन करीत आहोत.**

मा. पोलीस आयुक्त,
पुणे शहर यांचे मान्यतेने

(बच्चन सिंह)
पोलीस उप आयुक्त, गुन्हे,
पुणे शहर.